पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, पिंपरी चिंचवड-४११०३३
दुरध्वनी क्रमांक-२७३५०५५५

# -: पोलीस भरती २०१९ :-

## - महिला उमेदवारांसाठी सुचना -

दिनांक ०८.०६.२०२२

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या ७२० पदांचे अनुषंगाने चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय चाचणीमध्ये पात्र ठरणा-या एकुण २०९ महिला उमेदवारांना पोलीस शिपाई या पदासाठी **दिनांक १२.०६.२०२२ रोजी सकाळी ०८:०० वा. बालनगरी, गवळीमाथा, भोसरी येथील कोव्हीड केअर सेंटर येथे उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे.**

सदर महिला उमेदवार यांनी नियुक्तीसाठी हजर राहतेवेळी खालील नमुद केलेल्या सर्व बाबींची पुर्तता करुनच सदर दिवशी उपस्थित राहण्याची दक्षता घेण्यात यावी.

१. **दिनांक १२.०६.२०२२ रोजीपुर्वी त्यांची आरटीपीसीआर तपासणी करुन त्याबाबतचा निगेटिव्ह अहवाल असावा. ज्या नवप्रविष्ठ महिला पोलीस शिपाई यांच्याकडे आरटीपीसीआर तपासणी बाबतचा निगेटिव्ह अहवाल नसेल त्यांना प्रशिक्षणाकरीता पोलीस प्रशिक्षण केंद्रात हजर करुन घेण्यात येणार नाही. दिनांक १२.०६.२०२२ रोजीपुर्वी ४८ तासांचाच निगेटिव्ह रिपोर्ट असावा.**

२. शासकीय कर्मचा-यांना बँकेमार्फत वेतन अदा करण्यात येणार असल्याने राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडणे आवश्यक आहे. यापुर्वी राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्यास सदर खात्याचे एटीएम कार्ड आणि चेकबुक असणे आवश्यक आहे.

३. प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थी दाखल झालेनंतर त्यांचेकडून मेस ॲडव्हॉन्स म्हणून आगावू रक्कम रुपये ३५००/- (अक्षरी- तीन हजार पाचशे रुपये मात्र) जमा केली जाते. सदर रकमेची व्यवस्था प्रशिक्षणार्थीना प्रथम करावी लागते याची नोंद घ्यावी.

४. प्रशिक्षणार्थीनी सोबत येताना त्यांचे गणवेश (दोन संच), गणवेशातील शुज, डांगरी ड्रेस, मुक्ती ड्रेस (पांढ-या रंगाची सलवार), कुर्ता व निळया रंगाची ओढणी, ग्राऊंड किटस, हेअर नेट, वूलन ड्रेस, रेनकोटस, पीटी ड्रेस (दोन संच) व किट सरंजाम लाठी हेल्मेट सोबत बरोबर आणणे आवश्यक आहे.

५. जे प्रशिक्षणार्थी वैद्यकीय दृष्ट्या अपात्र तसेच गर्भवती असल्यास त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

६. आवश्यकते प्रमाणे सिव्हील ड्रेस प्रशिक्षणार्थी यांनी सोबत आणावेत. सदरचे ड्रेस साध्या स्वरुपाचे असावेत.

७. प्रशिक्षणार्थी यांना नैमित्तिक रजा वगळून कोणत्याही प्रकारची रजा मंजुर केली जाणार नाही. तथापी अपरिहार्य कारणास्तव संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत फक्त ०५ दिवस रजा मंजुर करण्यात येईल. त्यापेक्षा जास्त रजेची आवश्यकता भासल्यास त्या संबंधित त्या संबंधित महिला प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण चालू ठेवता येणार नाही. सदर प्रशिक्षणार्थीस मुळ घटकात परत पाठविण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. नवप्रविष्ठ महिला पोलीस शिपाई यांना स्वतःचे लग्न, नातेवाईकांचे लग्न तसेच इतर कार्यक्रमासाठी कोणत्याही प्रकारची रजा मंजुर करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

९. प्रशिक्षणार्थींनी ०२ नग बेडशिटव २ नग उशी कव्हर, मॅट, छोटी बादली, मोठी बादली, पाण्याचा जग तसेच दैनंदिन वापराचे इतर सव्र आवश्यक वस्तू सोबत आणाव्यात.

**१०.प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणासाठी येताना किमती व मौल्यवान वस्तू सोबत आणू नयेत तसेच सोबत २० पासपोर्ट साईज फोटो सोबत ठेवण्यात यावे.**

११.नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना प्रशिक्षण कालावधीत मध्यांतर देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१२.डिजिटल बुकचे वाचन तसेच प्रशिक्षणाशी निगडीत वाचनासाठी प्रशिक्षणार्थींना शक्य असल्यास त्यांनी लॅपटॉप सोबत आणावा. इतर कारणासाठी लॅपटॉपचा वापर होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१३.दिनांक १२.०६.२०२२ रोजी सायंकाळी १६:०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ येथे वेळेत पोहचणे आवश्यक असल्याने सर्व महिला उमेदवारांनी दिनांक १२.०६.२०२२ रोजी सकाळी ठिक ०८:०० वा. निश्चित वेळेत हजर राहण्याची दक्षता घेण्यात यावी.

**( सतिश माने )**
सहायक पोलीस आयुक्त, प्रशासन
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड